महापालिका आयुक्त कार्यालय,
अधिकार सुपुर्ती क्रमांक एम सी /डी.ई. एल/१५३५
दिनांक :-२४/०७/२०२६

मा. महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.मआ/मा०५/२६०७
दिनांक-: २४/७/२०२६

**-: अधिकार सुपूर्ती आदेश:-**

**विषय:- पुणे महानगरपालिके कडील विविध प्रकारच्या मालमत्तां संदर्भात संबधित सर्व खाते प्रमुखांद्वारे पार पाडावयाच्या कामकाजासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ८१ (ब ) ते (ई )चे अधिकार सुपूर्ती बाबत.**

संदर्भ:- १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ४(१)(क)सह ६७(३),६८ आणि ४९ व ६९(१)
२. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका जा.क्र.मआ /उआ/भू /१२७७ दिनांक :-२०/०६/२००९ रोजीचे अधिकार सुपुर्ती आदेश.

ज्याअर्थी , उक्त संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार महापालिका आयुक्त यांना प्रदान केलेले किंवा त्यांचेकडे सोपविलेले किंवा त्यामध्ये निहित असलेले कोणतेही अधिकार, कार्य व कर्तव्य ही उक्त अधिनियमाचे कलम ६९(१) नुसार महानगरपालिकेच्या अन्य अधिकारी यांना प्रदान करण्याबाबत तरतूद आहे. आणि,

ज्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४९ नुसार महानगरपालिका उपायुक्त यांनी महानगरपालिका आयुक्त आपले अधिकार व कर्तव्यांपैकी वेळोवेळी त्यांच्याकडे सोपवील अशा अधिकारांचा वापर केला पाहिजे व अशी कर्तव्य पार पाडली पाहिजे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ८१ अन्वये महापालिकेच्या मोकळ्या जागा /भूखंड / पार्किंग प्लेसेस/ॲमेनिटी स्पेस/बांधीव इमारती यामधून व्यक्तींना काढून टाकण्याचा, भाडयाची किंवा नुकसान भरपाईची रक्कम मालमत्ता कराची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा, महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या वेतनातून किंवा मजुरीतून वजा करून भाडे वसूल करण्याचा, दिवाणी न्यायालयाचे अधिकार इ. बाबी समाविष्ट आहेत.

त्याअर्थी, आता, मी नवल किशोर राम, महानगरपालिका आयुक्त कार्यालयीन कामकाजाच्या सोईसाठी व उपरोक्त नमूद मालमत्तांच्या अनुषंगाने प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी विविध खातेप्रमुखांद्वारे पार पाडावयाच्या कामकाजासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६९(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून संबंधित सर्व खाते प्रमुख यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ८१ (ब )ते (ई ) चे अधिकार प्रत्यार्पित करीत आहे.

सदर प्रत्यायोजित अधिकारांचा वापर सर्व खातेप्रमुख यांनी विविध प्रचलित अधिनियम, नियम, शासन आदेश आणि महानगरपालिका आयुक्तांचे वेळोवेळचे आदेश यामधील तरतूदी व अटी यांचे तंतोतंत पालन करुन मनपाच्या हितासाठी करणे बंधनकारक राहील. सदर प्रत्यायोजित अधिकाराचा वापर करुन संबंधित अधिकाऱ्यांनी घेतलेले निर्णय हे आवश्यकता भासल्यास महानगरपालिका आयुक्त यांचेद्वारे पुनरिक्षण करण्याच्या अधीन असतील. तसेच महानगरपालिका आयुक्त सदर प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांचा समवर्ती रुपाने वापर करण्यास सक्षम राहतील व महानगरपालिका आयुक्त यांचा प्रकरण निहाय निर्णय प्रत्यायोजित करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने घेतलेल्या निर्णयावर आधिभावी राहील.

वरीलप्रमाणे संबंधीत अधिकारी हे महानगरपालिका आयुक्त यांचेवतीने अधिनियमातील प्रचलित तरतुदींच्या तसेच प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांच्या अधिन राहून महानगरपालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली कामकाज पाहतील. हे

कामकाज पहात असतांना संबंधित अधिकारी यांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी सर्व प्रयोजनासाठी महानगरपालिका आयुक्त यांनी पार पाडल्या आहेत व केले आहेत असे मानले जाईल.

त्याचप्रमाणे उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये यापूर्वीचे या संबंधातील अधिकार प्रदान आदेश अधिक्रमित करण्यात येत असून सदर आदेश आता निष्प्रभावित होतील.

सदर अधिकार प्रत्यार्पणाच्या अनुषंगाने पार पाडलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा तसेच पारित केलेले आदेश यांची प्रत नियमितपणे मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे माहिती तथा संकलन करणे कामी सादर करण्यात यावी.

तरी प्रकरणी सर्व खातेप्रमुखांनी याची नोंद घेऊन कार्यवाही करावी.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :-

१) अतिरिक्त महापालिका आयुक्त ((ज/इ/वि)
पुणे महानगरपालिका
यांजकडे माहितीसाठी................

प्रत :-

२) सर्व खाते प्रमुख
पुणे महानगरपालिका
यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी.............